# कामाच्या ठिकाणी लैंगिक छळाला मनाई



**महिंद्र अँड महिंद्र लिमिटेड ("कंपनी") <u>सर्व कामांच्या ठिकाणी</u> सुरक्षित, प्रतिकूल, आणि <u>छळविरहित कामाचे वातावरण प्रदान करण्यावर</u> विश्वास ठेवते. <u>कामाच्या ठिकाणी लैंगिक छळाबाबत आम्ही शून्य-सहिष्णुतेचा दृष्टिकोन अवलंबतो</u>. लैंगिक छळामध्ये कोणतेही थेट <u>किंवा निहित अवांछित शारीरिक, शाब्दिक किंवा गैर-मौखिक लैंगिक स्वभावाचे आचरण समाविष्ट आहे.</u>**

## लागू असणे:

हे धोरण कंपनी आणि तिच्या उपकंपन्यांना लागू आहे आणि त्यामध्ये कंपनीशी संबंधित किंवा कंपनीला तिच्या कोणत्याही कामाच्या ठिकाणी भेट देणाऱ्या व्यक्ती अंतर्भूत आहेत. हे धोरण लिंगविशिष्ट नाही, ते सर्व कर्मचाऱ्यांना लागू आहे, मग त्यांची लैंगिक प्रवृत्ती किंवा पसंती कोणतीही असो.

## तक्रारी:

लैंगिक छळाच्या कोणत्याही तक्रारीचे शोधकार्य केले जाईल आणि ती सिद्ध झाल्यास ते गंभीर गैरवर्तन आणि कंपनीच्या आचारसंहितेचे आणि सेवानियमांचे उल्लंघन गणले जाईल आणि संबंधित व्यक्तींवर योग्य ती कारवाई केली सुरू केली जाईल.

<u>कोणतीही व्यथित व्यक्ती ज्यांना कामाच्या</u> ठिकाणी लैंगिक छळाचा अनुभव आला असेल, त्यांनी लवकरात लवकर संबंधित अंतर्गत तक्रार समितीच्या (आयसीसी) सदस्याशी संपर्क साधावा, जे तक्रार दाखल करण्यासाठी योग्य ते मार्गदर्शन करतील आणि तक्रार निकाली निघेपर्यंत सर्व प्रकारचे रास्त सहाय्य पुरवतील. नमूद केलेलीही तक्रार संबंधित आयसीसी समितीकडे लेखी स्वरुपात, सर्वात अलिकडील घटनेनंतर 3 महिन्यांच्या आत दाखल करावी. कोणत्याही प्रादेशिक आयसीसीकडे कामाचा ताण अधिक असल्यास, मुख्य नैतिकता अधिकारी नवीन तक्रार दुसऱ्या प्रादेशिक आयसीसीकडे पाठवू शकतात किंवा तात्पुरत्या स्वरुपात दुसऱ्या प्रादेशिक आयसीसीच्या सदस्यांना या आयसीसीमध्ये चौकशी करण्यासाठी नियुक्त करू शकतात. प्रत्येक चौकशी 90दि वसांमध्ये पूर्ण केली जाईल.

## गोपनीयता:

कोणत्याही तक्रारीशी संबंधित सर्व माहिती शक्य तितकी काळजीपूर्वक, संवेदशीलतापूर्वक आणि गुप्तपणे हाताळली जाईल आणि कोणतीही माहिती जी कोणत्याही पक्षाला किंवा साक्षीदाराची ओळख सांगू शकते, ती प्रसिद्ध केली जाणार नाही, कळवली जाणार नाही, किंवा कोणत्याही प्रकारे किंवा स्वरुपात लोकांनी, छापील माध्यमांना किंवा मीडियाला माहित करून दिली जाणार नाही.

## संरक्षण:

परिस्थितीनुसार गरज असल्यास आणि तक्रारदार/पीडित व्यक्तीला कोणत्याही प्रकारे स्वतःला धोका आहे असे वाटत असेल, तर कंपनी संरक्षण पुरवेल. चौकशी प्रलंबित असतानाच्या काळात तक्रारदार आयसीसीला लेखी विनंती करून अंतरिमस ट मागू शकतो, जिच्यावर आयसीसी विचार करून प्रत्येक प्रकरणाला अनुसरून निर्णय घेईल.

## तडजोड:

तक्रारदाराने विनंती केली तर, चौकशी सुरू होण्यापूर्वी आयसीसी समेट (सामंजस्यपूर्ण तोडगा) घडवून आणून तडजोड करू शकते , मात्र अशा समेटासाठी कोणतीही आर्थिक तडजोड केली जाणार नाही.

## खोट्या किंवा दुर्भावनापूर्ण तक्रारी:

खोट्या किंवा दुर्भावनापूर्ण तक्रारी दाखल करणारी किंवा कोणतेही निर्मित केलेले बनावट किंवा दिशाभूल करणारा दस्तऐवज सादर करणारी कोणतीही व्यक्ती योग्य त्या कारवाईस जबाबदार असेल

## प्रबोधन आणि प्रशिक्षण:

लैंगिक छळाबद्दल कर्मचाऱ्यांचे प्रबोधन करण्यासाठी आणि त्यांच्यामध्ये संवेदना निर्माण करण्यासाठी कंपनी प्रबोधनाचे कार्यक्रम आयोजित करेल आणि संवादासाठी व्यासपीठे तयार करेल.

अधिक तपशील – या पीओएसएच धोरणांतर्गत जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वांमध्ये मिळू शकेल.

mahindra Rise